# इचलकरंजी महानगरपालिका, इचलकरंजी.

## आस्थापना व सामान्य प्रशासन विभाग

## Walk in Interview Notice

इचलकरंजी महानगरपालिकेच्या खालील विभागाकडील विवक्षित कामकाजासाठी म.न.पा./न.प./सार्व.बांधकाम विभाग/महाराष्ट्र जीवन प्राधिकरण/जिल्हा परिषद तसेच अन्य शासकीय/ निमशासकीय कार्यालये/ स्थानिक स्वराज्य संस्था/आरोग्य विभाग/शासकीय रुग्णालये यांच्या सेवेतून त्या त्या पदावरून सेवानिवृत्त झालेल्या अर्हताधारक अधिकारी / कर्मचारी यांचेकडून करार पद्धतीने सेवा उपलब्धतेकामी इम्पॅनेलमेंटकरिता खाली नमूद अटी/शर्तीस अधीन राहून अर्ज मागविणेत येत आहेत.

१) तहसिलदार / नायब तहसिलदार (निवडणूक/जनगणना विभागाकरिता)
२) वैद्यकीय आरोग्य अधिकारी (घन कचरा व्यवस्थापन विभागाकरिता)
३) पशुशल्य चिकित्सक (पशुशल्य चिकित्सा विभागाकरिता)
४) शाखा अभियंता (सार्व.बांधकाम विभागाकरिता)
५) मुख्य उद्यान अधीक्षक/ उद्यान पर्यवेक्षक (उद्यान व वनसंवर्धन विभागाकरिता)

**अटी / शर्ती**

१) Walk in Interview करिता उपस्थित रहाणा-या तसेच मुलाखत प्रक्रीयेअंती निवड करण्यात आलेल्या उमेदवारावर महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दिनांक ०८ जानेवारी,२०१६(महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध व संगणक संकेतांक २०१६०१०७१२१७१४९००७) मधील सर्व अटी / शर्ती बंधनकारक राहतील.

२) Walk in Interview करिता उपस्थित रहाणारा सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी शारीरिक/मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

३) Walk in Interview करिता उपस्थित राहण्यासाठी कमाल वयोमर्यादा ७० वर्षे इतकी आहे.त्यापेक्षा अधिक वय असणा-या उमेदवारांचा विचार केला जाणार नाही.

४) इम्पॅनेलमेंट केल्यानंतर संबंधित विभागाकडे आवश्यकतेनुसार अधिका-यांच्या सेवा उपलब्ध करून घेण्यात येणार असून त्यापेक्षा अधिक उमेदवार पात्र ठरल्यास गुणानुक्रमे निवड करून उर्वरित उमेदवारांचा प्रतीक्षा सूचीमध्ये समावेश केला जाईल.

५) उमेदवाराच्या नियुक्तीसंबंधी तसेच करण्यात आलेली नियुक्ती कोणत्याही वेळी रद्द करण्याबाबत मा.आयुक्त तथा प्रशासक यांचा निर्णय अंतिम राहील.

तरी इच्छुकांनी त्यांचे अर्ज व अर्हता/अनुभव विषयक कागदपत्रांसह (मूळ व छायांकित प्रती) दिनांक १९.०९.२०२४ रोजी सकाळी ११.३० वाजता उपायुक्त(मुख्यालय) यांचे कार्यालयात उपस्थित रहावे.

जा.क्र.आस्था.व सा.प्र.वि./ २१८ /२०२४,
दिनांक ११.०९.२०२४

उपायुक्त(३),
इचलकरंजी महानगरपलिका.